**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, जाफ्राबाद यांच्या न्यायालयात**
(एम.एन.जयस्वाल यांचे समक्ष)

**नि.दि.दा.क्र.११८/२०२१** **नि.क.०५**

वादी मोहंमद नवाज मोहंमद अब्बास

**—विरुध्द—**

प्रतिवादी मोहंमद ताहेर मोहंमद अब्बास

---

अर्जदारातर्फे : विधिज्ञ श्री. एस.व्ही.देशपांडे
गैरअर्जदारातर्फे : विधिज्ञ श्री. आर.व्ही.मगर

---

**नि.क.०५ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, चे आदेशिका ३९ नियम १ व २ अन्वये गैरअर्जदार यांनी वाद मिळकत त्रयस्थ व्यक्तीच्या हक्कात हस्तांतरित करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम मिळणे करीता दाखल केलेला आहे.

२. वाद मिळकतीचे वर्णन :— मौजे गोंदनखेडा, ता. जाफ्राबाद येथील शेत जमीन गट क. ६४ क्षेत्र ३ हे. १६ आर. पैकी मध्यभागाची १ हे. ८ आर. जमीन ज्याची चतु:सीमा खालील प्रमाणे:

पूर्वेस — जाफ्राबाद देउळगाव राजा रोड,

पश्चिमेस— नजीर शेख बशीर यांची जमीन,

उत्तरेस — नजीर खान शब्बीर खान पठाण यांची जमीन व

दक्षिणेस — मोहंमद अशरफ मोहंमद अब्बास यांची जमीन (या पुढे वरील मिळकतीस वाद मिळकत म्हणून संबोधण्यात येईल)

**<u>अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की</u>** :—

३. अर्जदार हे वाद मिळकतीचे मालक व ताबेदार आहे. सदरची वाद मिळकतीचे पूर्वीचे मालक हे त्यांचे वडील मोहंमद अब्बास शेख चिमन हे होते. त्यांनी त्यांच्या हयातीत गट नं. ६४ ही जमीन वादी, त्यांचे भाउ मोहंमद अशरफ आणि मोहंमद साबेर यांना प्रत्येकी पाच आणे चार पाई या हिस्स्याने वाटून दिली होती व त्याअन्वये अर्जदार यांच्या हिस्स्यावर गट नं. ६४ मधील मधला भाग १ हे. ८ आर. जमीन म्हणजेच वाद मिळकत आली व त्याचा प्रत्यक्ष ताबा त्यांना देण्यात आला. तेव्हापासून अर्जदार हे वाद मिळकतीचे मालक व ताबेदार म्हणून सदर मिळकतीचा उपभोग घेत आहे. सदर वाद मिळकतीत गैरअर्जदार यांचा कुठलाही हक्क किंवा संबंध नाही.

४. अर्जदार यांनी वाद मिळकत इतर कोणासही हस्तांतरित केली नाही. अर्जदार हे जाफ्राबाद येथे हॉटेलचा व्यवसाय करतात. त्याचाच गैरफायदा घेउन गैरअर्जदार यांनी त्यांच्या पाठीमागे खोटे व बनावट वाटणीपत्र तयार करुन फेरफार क्र. ७५८ अन्वये वाद मिळकतीचा फेर बेकायदेशीररित्या स्वत:च्या नावे करुन घेतला. सदरचा फेर हा बेकायदेशीर असून त्या आधारे मालकी हक्क गैरअर्जदाराला प्राप्त होउ शकत नाही. सदर बेकायदेशीर नोंदणीबाबत माहिती झाल्यावर अर्जदार यांनी गैरअर्जदार यांना त्यांची जमीन त्यांच्या नावे करुन दे असे म्हटले त्यावेळेस तेथे इतर पाहुणे व मित्रमंडळी होती. त्यांनी सुध्दा गैरअर्जदारास समजावून सांगितले व प्रकरण आपसात मिटवून टाकण्यास सांगितले. तेव्हा त्यांच्या दडपणाखाली गैरअर्जदाराने अर्जदारास तात्पुरता म्हणून वाद मिळकतीपैकी १ गुंठा जमीन दि. २५.०९.२०१७ रोजी वाटणीपत्राद्वारे करुन दिला व उर्वरीत जमीन नंतर नावावर करुन देतो असे आश्वासन दिले. परंतु त्यानंतर अर्जदाराने वाद मिळकत अर्जदाराच्या हक्कात करुन देण्यास सतत टाळाटाळ केली व दि. १५.१०.२०२१ रोजी गैरअर्जदाराने अर्जदाराला ते जमीन त्यांच्या नावे करुन देणार नसल्याचे सांगितले व ते फेरफार क्र. ७५८ अनुसार मालक झाल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे गैरअर्जदाराने अर्जदाराची मालकी

नाकारल्यामुळे अर्जदाराने हा प्रस्तुतचा दावा दाखल करुन अर्जदाराने वाद मिळकत इतर कोणीही त्रयस्थ व्यक्तीच्या हक्कात हस्तांतरित करु नये असा तात्पुरता मनाईहुकुमाचा अर्ज मंजूर व्हावा अशी विनंती अर्जदार यांनी याद्वारे केली आहे.

५. गैरअर्जदार यांनी त्यांचा जबाब व म्हणणे नि. ५ वरील म्हणणे नि. क्र.११ अन्वये दाखल केले आहे. गैरअर्जदाराने अर्जदार हे वाद मिळकतीचे मालक व ताबेदार असल्याचे इन्कार केला आहे. वाद मिळकतीचे पूर्वीचे मालक हे अर्जदाराचे वडील होते तसेच त्यांनी गट नं. ६४ ची जमीन अर्जदार व त्यांचे दोन भाउ यांना प्रत्येकी पाच आणे चार पाई या हिस्स्या प्रमाणे वाटून दिली व त्या अनुषंगाने फेरफार क्र. ८० घेण्यात आला हे त्यांनी मान्य केले आहे. परंतु तेव्हापासून आजपर्यंत त्या वाद मिळकतीवर अर्जदाराचा ताबा असल्याचा त्यांनी इन्कार केला आहे. सन २००७ मध्ये अर्जदाराने सदर वाद मिळकत ही गैरअर्जदारास वाटणीपत्राअन्वये वाटून दिली आहे व तेव्हा पासून महसुल अभिलेखावर ७/१२ उता—यावर मालक व ताबेदार म्हणून अर्जदाराची नोंद नाही. उलट मसहुल अभिलेखाच्या ७/१२ वर गैरअर्जदाराची मालक व ताबेदार म्हणून मागील १४ वर्षापासून नोंद कायम आहे. त्यामुळे अर्जदाराची मागणी त्याला मालक घोषित करण्यात यावे ही मुदतबाहय आहे. इतर मजकुराचा गैरअर्जदाराने स्पष्टपणे इन्कार केला.

६. पुढे त्यांनी असे नमूद केले आहे की, वर नमूद केल्याप्रमाणे अर्जदाराच्या वडीलांनी गट क्र. ६४ मधील जमीन अर्जदार व इतर दोन भावांच्या नावे केली होती. त्यानुसार १ हे. ८ आर. जमीन अर्जदाराकडे आली होती. त्याच प्रमाणे अर्जदाराचे वडील व त्यांचे भाउ यांच्या नावे जुना सर्वे नं. ६१ नवीन गट क्र. १०६ मध्ये ५ हे. ७४ आर. जमीन होती. त्या जमिनीपैकी आठ आणे जमीन अर्जदाराच्या वडीलांच्या हिस्स्यात आली. त्यांच्या हिस्स्यावर आलेली जमीन त्यांनी त्यांचे इतर तीन मुलं गैरअर्जदार यांचे दोन भाउ यांना प्रत्येकी २ एकर २१ गुंठे प्रमाणे वाटुन दिली व त्या अनुषंगाने फेरफार क्र.

७२२ मंजूर झाला. सदरच्या नोंदी हया सन २००७ पर्यंत कायम होत्या.

७. गट क. १०६ मध्ये जमीन ही चांगल्या प्रतीची असल्या कारणाने अर्जदाराला गोंदनखेडा येथील गट क. ६४ च्या जमिनी ऐवजी गट क. १०६ मधील हिस्सा वाटून पाहिजे होता व त्याबाबत त्यांनी वारंवार त्यांच्या इतर भावांना तशी मागणी केली. परंतु तो हिस्सा देण्यास इतर कोणीही तयार नव्हता. पुढे अर्जदाराचे वडील मयत झाले. परंतु अर्जदाराने त्याला गट नं. १०६ मधील वाटणी मिळावी अशी मागणी कायम ठेवली. त्यामुळे गैरअर्जदाराने त्यांच्या आईच्या सुचनेप्रमाणे व इतर भावांची सुध्दा इच्छा असल्याने व अर्जदाराची नाराजी कायमची दुर व्हावी म्हणून त्यांनी त्यांच्या वाटयाची जमीन अदलाबदली करण्याची तयारी दर्शवली. त्या अनुसार अर्जदाराने गट क. ६४ मधील १ हे. ८ आर. जमीन म्हणजेच वाद मिळकत ही दि. ०२.०२.२००७ रोजी वाटणीपत्राद्वारे गैरअर्जदाराला वाटुन ताब्यात दिली. त्याबाबतचा फेरफार क. ७५८ हा दि. २१. ०३.२००७ साली मंजूर करण्यात आला. तसेच गैरअर्जदार यांना त्याच्या वाटणीस आलेल्या गट क. १०६ मधील १ हे. १ आर. जमीन अर्जदारास दि. ०२.०२.२००७ रोजी वाटणीपत्राद्वारे वाटुन ताब्यात दिली व त्या अन्वये फेरफार क. १६१६ हा दि. ११.०६.२००७ रोजी मंजूर झाला. अशा प्रकारे अर्जदाराने व गैरअर्जदाराने आपसात सदर जमिनीची अदलाबदली केली. त्यास महसुल अधिकारी यांनी सुध्दा मान्यता दिली. तेव्हापासून अर्जदाराचा वाद मिळकतीशी कोणताही संबंध नाही. सदरची माहिती ही अर्जदाराने न्यायालयापासून लपवून ठेवली आहे. अर्जदाराने सदर फेरफार नोंदीस आजपर्यंत कोणताही आक्षेप नोंदविला नाही.

८. सदर वाटणी अनुसार अर्जदार हे जाफ्राबाद येथील गट क. १०६ या जमिनीतील १ हे. १ आर. जमिनीचा मालक म्हणून काबीज असून त्याची वहिती करीत आहे. तसेच गट क. १०६ या जमिनीच्या पिकांच्या नुकसानीबाबत वेळोवेळी आलेले अनुदानसुध्दा त्यांने घेतलेले आहे. परंतु त्याबाबत सत्य परिस्थिती अर्जदाराने न्यायालयापासून लपवून ठेवलेली आहे. सन २००७ पासून

वाद मिळकतीवर गैरअर्जदार हे मालक म्हणून काबीज आहे. तसेच आपसातील संबंध चांगले राहावे म्हणून त्यांनी वाद मिळकतीतून एक प्लॉट अर्जदाराला देण्याची तयारी दर्शवली व त्या अनुषंगाने दि. २५.०९.२०१७ रोजी वाटणीचा दस्त नोटरीसुध्दा करुन घेतला. वाद मिळकतीवर अर्जदाराचा ताबा व मालकी नाही. सदरचा दावा हा अर्जदाराने त्याला रोडलगतचे पाच प्लॉट मिळावे या करीता गैरअर्जदारावर दबाव आणण्यासाठी दाखल केला आहे. सदरचा दावा व प्रस्तुतचा अर्ज हा खोटा व बनावट असल्याने खारीज व्हावा अशी विनंती केली आहे.

९. अर्जदाराचे विधिज्ञ श्री.देशपांडे व गैरअर्जदाराचे विधिज्ञ श्री. मगर यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

१०. अर्ज, म्हणणे, अभिलेखावरील कागदपत्रे व दोन्ही बाजुंच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकता खालील मुद्दे माझे विचारार्थ निघतात. त्यावरील निष्कर्ष हे मी त्यापूढे नोंदविलेल्या कारणमिमांसेसह नोंदवित आहे.:—

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | प्रथम दर्शनी केस अर्जदाराच्या बाजूने असल्याचे अर्जदार सिद्ध करतो काय? | नाही ...... |
| २ | सोयीस्करतेची तुला ही अर्जदाराच्या बाजूने आहे असे अर्जदार सिद्ध करतो काय? | नाही ...... |
| ३ | मागणी केल्याप्रमाणे तात्पुरत्या मनाईहुकूमाचा आदेश अर्जदाराच्या बाजुने न झाल्यास अर्जदाराचे अपरिमीत असे नुकसान होणार आहे काय? | नाही ...... |
| ४ | आदेश काय? | अंतिम आदेशा प्रमाणे |

**::कारणमिमांसा::**

**<u>मुद्दे क्र. १ ते ३ करिता</u>** :—

११. मुद्दे क्र. १ ते ३ हे एकमेकाशी संलग्न असल्याने व मजकुराची

पुनरावृत्ती टाळण्याकरीता मी सदरील मुद्‌दे एकत्र विचारार्थ घेत आहे. तात्पुरता मनाईहुकुम हा ऐच्छिक अनुतोष आहे. ते मिळण्याकरीता अर्जदाराला प्रथमदर्शनी बाजू, न्यायाचे समतोलत्व व कधीही न भरून येणारे नुकसान या बाबी सिध्द करणे आवश्यक आहे. सदरच्या बाबी अर्जदार हे शपथपत्राच्या आधारे किंवा कागदोपत्री पुराव्यानिशी सिध्द करू शकते. परंतू, कोणत्याही परिस्थितीमध्ये तिला गैरअर्जदारांच्या दुबळया बचावाचा फायदा मिळणार नाही.

१२. अर्जदाराच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला आहे की, त्यांच्या वडीलांनी गट क्र. ६४ मधील ३ हे. १६ आर. जमीन ही अर्जदार व त्यांचे इतर दोन भाउ यांना पाच आणे चार पाई या हिस्स्याने वाटून दिली. त्या अनुसार वादीच्या हिस्स्याला १ हे. ८ आर. जमीन म्हणजेच वाद मिळकत आली. तसेच त्याचा ताबासुध्दा त्यांना प्रत्यक्षात देण्यात आला. त्याबाबतचा फेरफार क्र. ८० हा दि. १०.०२.१९८१ रोजी मंजूर करण्यात आला आहे. तेव्हा पासून वाद मिळकतीवर अर्जदाराचा ताबा व मालकी आहे. अर्जदार हे जाफ्राबाद येथे व्यवसाय करीत असल्या कारणाने गैरअर्जदाराने त्यांच्या पाठीमागे खोटे व बनावट वाटणीपत्र तयार करुन सदर वाद मिळकत त्यांच्या नावे करुन घेतली आहे. परंतु सदरचे वाटणीपत्र हे खोटे व बनावट असल्या कारणाने वाद मिळकतीवर गैरअर्जदाराच्या नावाचा फेर सुध्दा खोटा आहे व त्या फेर अनुसार त्याला कोणताही मालकी हक्क प्राप्त होत नाही. आजरोजी सुध्दा अर्जदार हे वाद मिळकतीचे मालक व ताबेदार असल्या कारणाने गैरअर्जदाराला सदरची वाद मिळकत इतर त्रयस्थ व्यक्तींच्या हक्कात हस्तांतरण करण्यापासून रोखण्याकरीता त्यांनी हा प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. तात्पुरता मनाईहुकुम मिळण्याकरीता लागणा—या आवश्यक तीनही घटक हे त्यांच्या बाजुने असल्याने त्यांचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती त्यांनी याद्वारे केली. अर्जदारातर्फे खालील न्याय निर्वाडे दाखल करण्यात आले आहे.

1- Ganpati Renge Vs. State of Maharashtra, 1998 (2) Mh.L.J. 845

2- Narayan Kathole Vs. Ganeshgir,

१३. याउलट गैरअर्जदारातर्फे असे नमूद करण्यात आले आहे की, अर्जदार व गैरअर्जदार हे सख्खे भाउ असून त्यांना अजुन चार भाउ आहे. त्यांच्या वडीलांनी गट क्र. ६४ मधील जमीन अर्जदार व इतर दोन भाउ व गट क्र. १०६ मधील जमीन गैरअर्जदार व इतर दोन भाउ यांना वाटुन दिली होती व त्याचा स्वतंत्र ताबा सुध्दा प्रत्येकाला देण्यात आला होता. त्याबाबतची फेरफार नोंद क्र. ८० सुध्दा घेण्यात आली होती. सदरची परिस्थिती ही सन २००७ पर्यंत कायम होती. परंतु गट क्र. १०६ मधील जमीन चांगल्याप्रतीची असल्या कारणाने अर्जदाराची मागणी होती की, त्याला गट क्र. ६४ च्या जमिनीऐवजी गट क्र. १०६ मधील जमिनीत हिस्सा मिळावा. त्यामुळे त्यांच्या आईच्या सांगण्यावरुन व इतर भावांच्या संमतीने गैरअर्जदाराने सन २००७ मध्ये त्यांच्या नावे असलेली गट क्र. १०६ मधील जमीन वाटणीपत्राद्वारे अर्जदाराच्या नावे केली व अर्जदाराने त्याची गट क्र ६४ मधील जमीन म्हणजेच वाद मिळकत ही त्याने गैरअर्जदाराच्या नावे वाटणीपत्राद्वारे केली. सदर वाटणीपत्राद्वारे फेरफार क्र. १६१६ व ७५८ मंजूर करण्यात आला व त्याअनुसार वाद मिळकत ही गैरअर्जदाराच्या मालकी व ताब्यात असून गट क्र. १०६ मधील १ हे. १ आर. जमीन अर्जदाराच्या ताब्यात आहे. परंतु सदरची वाद मिळकत ही हडप करण्याच्या दृष्टीने अर्जदाराने हा चुकीचा व खोटा दावा दाखल केला आहे. अर्जदाराने त्याच्या मालकीसंबंधाचे एकही दस्तऐवज प्रकरणात दाखल केले नाही. उलट त्याने सत्य परिस्थिती न्यायालयापासून लपवून ठेवली आहे. तात्पुरता मनाईहुकुम मिळण्याकरीता आवश्यक असलेले तीनही घटक हे गैरअर्जदाराच्या बाजुने आहे. सबब, अर्जदाराचा अर्ज हा खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी विनंती त्यांनी याद्वारे केली.

१४. अर्जदाराने नि.क्र. ४ अन्वये दस्तऐवज दाखल केले असून. गैरअर्जदाराने नि.क्र. १२ व १५ अन्वये दस्तऐवज व शपथपत्र दाखल केले आहे.

१५. आज रोजी ७/१२ उता—यावर वाद मिळकतीबाबत मालक म्हणून गैरअर्जदाराची नोंद आहे. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, सदरची नोंद ही गैरअर्जदाराने खोटे वाटणीपत्र तयार करुन घेतली आहे. पुढे त्यांनी असे नमूद केले आहे की, महसुल अभिलेखात नोंदणीआधारे मालकी सिध्द होत नाही. त्या करीता त्यांनी वर नमूद केलेल्या न्याय निर्वाडयांचा आधार घेतलेला आहे. त्यांचे असेही म्हणणे आहे की, गैरअर्जदाराच्या म्हणण्यानुसार जर खरच जमिनीची अदलाबदली झाली असती तर त्याबाबत नोंदणीकृत exchange deed असणे आवश्यक होते. परंतु त्याबाबत कोणतेही दस्तऐवज गैरअर्जदाराने दाखल केले नाही. पुढे त्यांनी असेही म्हटले आहे की, भारतीय नोंदणी कायदयाच्या कलमा अंतर्गत जर एखादया दस्ता द्वारे एखादी मिळकत हस्तांतरित होत असेल तर ते दस्तऐवज नोंदणीकृत होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरच्या नोंदणी आधारे गैरअर्जदार हा मालक होत नाही. याउलट गैरअर्जदारातर्फे असे नमूद करण्यात आले आहे की, अर्जदाराने दाखल केलेले न्याय निर्वाडे हे त्यांच्याच बाजुचे आहे. अर्जदाराने वाद मिळकतीवर त्यांची मालकी आहे हे दर्शविण्याकरीता कोणतेही दस्तऐवज दाखल केले नाही. फक्त महसुल नोंदीच्या आधारे मालकी सिध्द होत नाही. आज रोजी अर्जदाराच्या बाजुने वाद मिळकतीसंबंधी महसुल नोंदीसुध्दा नाही. तसेच मालकीसंबंधी कोणतेही दस्तऐवज त्याच्याकडे नाही. याउलट गैरअर्जदाराच्या नावाने वाद मिळकतीसंबंधी नोंदी आहे. तसेच त्याने केलेल्या कथनाला बळकटी देण्याकरीता दस्तऐवज सुध्दा उपलब्ध आहे. गैरअर्जदाराने जमिनी अदलाबदली केल्याच्या कथनाला दुजोरा देण्याकरीता फेरफार क. ७५८ व १६१६ दाखल केला आहे. तसेच मोहंमद साबेर मोहंमद अब्बास व मोहंमद आशरफ मोहंमद अब्बास यांचे शपथपत्र दाखल केले आहे. या दोन्ही साक्षीदारांनी गैरअर्जदाराच्या कथनाला दुजोरा दिला आहे.

१६. तातपुरता मनाईहुकुम मिळण्याकरीता प्रथमदर्शनी केस ही शपथपत्राआधारे किंवा दस्तऐवजांच्या आधारे सिध्द करता येते. गैरअर्जदाराने त्याची बाजु सिध्द करण्याकरीता मोहंमद साबेर व मोहंमद आशरफ यांचे

शपथपत्र दाखल केले आहे. तसेच फेरफार क्र. ७५८ व १६१६ हे त्याच्या कथनाला बळकटी देतात. याउलट अर्जदाराची वाद मिळकतीवर त्याची मालकी सिध्द करण्याबाबत कोणतेही दस्तऐवज अभिलेखावर उपलब्ध नाही. अर्जदाराने गट क्र. ६४ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्यामध्ये गैरअर्जदाराच्या नावाची नोंद आहे. तसेच त्यांनी फेरफार क्र. ८० ची नक्कल दाखल केली आहे. त्या अनुसार त्यांच्या वडीलांनी वाद मिळकत त्यांना वाटून दिली होती. तसेच त्यांनी फेरफार क्र. ७५८ सुध्दा दाखल केली आहे. त्या अनुसार त्यांनी वाद मिळकत ही गैरर्जदाराला वाटून दिली आहे. परंतु त्यांच्या म्हणण्या अनुसार सदरची नोंद ही चुकीची आहे. वर नमूद केलेल्या न्याय निर्वाडयांमध्ये मा. उच्च न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले आहे की, महसुल अभिलेखातील नोंदी हया फक्त महसुल गोळा करण्याकरीता आहे. त्यावरुन मालकी सिध्द होत नाही. सदरचा निकष हा प्रस्तुत प्रकरणाला सुध्दा लागू पडतो. प्रस्तुतच्या प्रकरणात सुध्दा महसुल नोंदीवरुन मालकी सिध्द होत नाही. प्रस्तुतचा दावा व अर्ज हा अर्जदाराने दाखल केला आहे व त्यामध्ये तो वाद मिळकतीचा मालक व ताबेदार असल्याचे त्याचे म्हणणे आहे. त्यामुळे तो वाद मिळकतीचा मालक आहे हे सिध्द करण्याची जबाबदारी अर्जदारावरच आहे. परंतु अर्जदाराकडून वाद मिळकत ही त्याच्या मालकीची असल्याचे दर्शविण्यासाठी कोणतेही दस्तऐवज दाखल करण्यात आले नाही. याउलट गैरअर्जदाराच्या कथनाला बळकटी देण्याकरीता गैरअर्जदारातर्फे साक्षीदारांचे शपथपत्रे व दस्तऐवज दाखल करण्यात आले आहे.

१७. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज हा गैरअर्जदाराने वाद मिळकत ही हस्तांतरित करु नये म्हणून तात्पुरता मनाईहुकुमाचा अर्ज दाखल केला आहे. परंतु अर्जदाराने दाव्यात किंवा अर्जामध्ये कुठेही गैरअर्जदार हे वाद मिळकत हस्तांतरित करीत आहे किंवा करण्याच्या प्रयत्नात आहे असे नमूद केले नाही. कोणतेही कारण नसतांना एखादया विरुध्द मनाईहुकुमाचा आदेश पारित करणे हे योग्य व न्याय उचित नाही. तात्पुरता मनाईहुकुम मिळण्याकरीता अर्जदाराला वाद

मिळकत ही त्याच्या मालकीची आहे किंवा वाद मिळकतीमध्ये त्याचा हक्क किंवा हिस्सा आहे व सदरचा हिस्सा डावलण्यासाठी गैरअर्जदार हे वाद मिळकत हस्तांतरित करीत आहे हे सिध्द करणे आवश्यक होते. परंतु अर्जदार तसे करण्यास अपयशी ठरला आहे.

१८. जरी महसुल नोंदीच्या आधारे मालकी सिध्द होत नसली तरी सदरच्या नोंदी हया जो पर्यंत त्या खोटया हे सिध्द होत नाही तो पर्यंत ते बरोबर असल्याचे गृहितक आहे. अर्जदाराचे म्हणणे आहे की, फेरफार क्र. ७५८ हा खोटा आहे. मग त्याने आजपर्यंत त्याबाबत आक्षेप का नोंदवला नाही. तसेच जर गैरअर्जदाराने खोटे दस्तऐवज तयार करुन वाद मिळकत स्वतःच्या नावाने करुन घेतली तर अर्जदाराने त्याच्याविरुध्द आजपर्यंत कारवाई का केली नाही असे प्रश्न उपस्थित होतात. त्याबाबत अर्जदाराकडून कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आले नाही.

१९. आज रोजी ७/१२ उता—यावर वाद मिळकतसंबंधी गैरअर्जदाराच्या नावाची नोंद आहे. तसेच त्याच्या बाजुने फेरफार नोंदी सुध्दा आहे. त्याच्या कथनाला बळकटी देण्याकरीता साक्षीदारांचे शपथपत्र सुध्दा दाखल करण्यात आलेले आहे. याउलट अर्जदाराच्या बाजुला बळकटी देण्याकरीता कोणतेही दस्तऐवज अभिलेखावर उपलब्ध नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी केस व न्यायाचा समतोलत्व हे अर्जदाराच्या बाजुने दिसून येत नाही. गैरअर्जदार हे वाद मिळकत हस्तांतरित करीत आहे त्याबाबत अर्जदाराने कुठेही नमूद केले नाही. तसेच वाद मिळकतीवर अर्जदाराचा ताबा किंवा मालकी असल्याबाबत कोणतेही दस्तऐवज नाही. याउलट वाद मिळकत ही गैरअर्जदाराच्या मालकी व ताब्यात असल्याचे दर्शविण्याकरीता फेरफार नोंद व ७/१२ उता—याची नोंद आहे. अशा परिस्थितीमध्ये जर प्रस्तुतचा अर्ज मंजूर केला तर गैरअर्जदाराचे कधीही भरुन न येणारे नुकसान होईल. याउलट अर्ज नामंजूर केला तर अर्जदाराचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर ''नकारार्थी'' देत आहे व खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

: **आदेश** :

१. नि.क्र.५ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

MANGESH N JAISWAL

Digitally signed by MANGESH N JAISWAL
Date: 2022.04.27 16:35:15 +0530

(एम.एन.जयस्वाल)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
जाफ्राबाद.

दिनांक: २७/०४/२०२२.

**—:प्रमाणपत्र:—**

मी प्रमाणित करीतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न् शब्द मुळ न्यायनिर्णय/आदेशा प्रमाणे आहे.

स्वाक्षरीत/—
(ए.आय.शेख)
लघुलेखक ग्रेड—३.

दिनांक :— २७/०४/२०२२